महाराष्ट्र शासन
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

दूरध्वनी क्र.०२२-२४९२७६३१, विस्तारीत क्र.११५
ई -मेल-mcemp.dma@gmail.com
संकेतस्थळhttps://mahadma.maharashtra.gov.in

नवीमुंबई महानगरपालिका इमारत,
७ वा मजला बेलापूर भवन (सी.बी.डी.)
बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

---

क्र. नपाप्रस/२०२३/वा.ह./स. का./प्र.क्र.५०-२०१७/कक्ष -४ (६)/6579 दिनांक- १०.०९.२०२५

10 SEP 2025

प्रति,

१. विभागीय सह आयुक्त,
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक
कार्यालय (सर्व)

२. जिल्हा सह आयुक्त,
नगरपरिषद प्रशासन शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व)

३. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व).

**विषय- लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत दि.२४.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेबाबत.**

**संदर्भ-** १) या संचालनालयाचे सम क्रमांकाचे पत्र दिनांक २१.०२.२०२५.

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दिनांक २४/०२/२०२३.

३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय सुधारणा/शुध्दीपत्रक क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.१६/सआक, दिनांक ११/३/२०२४,

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०२४/प्र.क्र.७०/सआक, दिनांक १३/१०/२०२४.

५) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील आदेश दिनांक ०८.०१.२०२५.

६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे पत्र क्रमांक-सफाई/ २०१८ /प्र.क्र.४६/ सआक,/ दिनांक २८.०१.२०२५.

वरील विषयाच्या संदर्भाने संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक ०१,दिनांक २१.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील नगरपरिषद /नगरपंचायतीमध्ये लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत.

परंतु संचालनालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यासंदर्भात नगरपरिषद /नगरपंचायत यांचेकडून वरील संदर्भाधीन शासन निर्णय, शासन

परिपत्रक व संचालनालयाचे पत्र तसेच मा. न्यायालयांचे आदेश इत्यादीचे काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत नाही. याबाबत विविध संघटना/ उमेदवार यांच्याकडून या कार्यालयास वारंवार तक्रारी प्राप्त होत आहे.

तसेच विभागीय सह आयुक्त कार्यालय, जिल्हा सह आयुक्त, स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीकडून वारंवार अनावश्यक मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. आणि विनाकारण सदरच्या नियुक्त्या प्रलंबित ठेवण्यात येत आहेत. तसेच नगरपालिका स्तरावर मंजुरी मिळू शकणारी अनेक पात्र प्रकरणे पत्र व्यवहारांमध्ये अडकून विलंब होत आहे व या कार्यालयाचे काम अनावश्यक वाढत आहेत.

तसेच सदर प्रकरणाबाबत दिनांक ०९.०९.२०२५ रोजी आढावा घेतला असता, विविध नगरपालिकांमध्ये खूप प्रकरणे अनावश्यक प्रलंबित असल्याचे आढळून आले आहेत.

याकरिता, सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद /नगरपंचायत यांना सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करून प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक-सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, /दि.२४.२.२०२३ च्या शासन निर्णय तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र. ३२०४/२०२३ (श्री.गोरोबा राम आरदवाड व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन) मध्ये दिलेल्या दिनांक ०८.०१.२०२५ रोजीचा आदेश तसेच संचालनालयाचे दिनांक २१.०२.२०२५ चे पत्र व इतर आदेश /पत्र इत्यादी याचे सखोल अवलोकन करून, नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी. अनावश्यक पत्र व्यवहार / कालापव्यय करू नये, पुढील आढाव्यामध्ये विनाकारण प्रकरणे प्रलंबित ठेवल्याचे आढळून आल्यास सबंधित अधिकारी /कर्मचारी यांचेवर कार्यवाही येईल, याबाबत नोंद घ्यावी.

वरील संदर्भात संबधित जिल्हा सह आयुक्त आणि विभागीय सह आयुक्त यांनी दरमहा आढावा घ्यावा व अनावश्यक पत्र व्यवहार / कालापव्यय करू नये.

(अभिषेक कृष्णा, भा.प्र.से.)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
नवी मुंबई.